# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

दिनांक : २० जानेवारी, २०१९

(**वेळ** : सकाळी १०.३० ते दुपारी १.१५)

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

**प्रश्न क्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **१०**

१९४५ साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक क्रिकेट संघ पुण्यात आला होता. पूना क्लबच्या ग्राऊंडवर त्याची एक मॅच झाली. या सामन्याला अर्थात तिकिट होते व मैदानावर गोलाकार कनात घालण्यात आलेली होती. त्यामुळे आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते. ही मॅच तर पाहायला पाहिजे आणि तीही फुकटात. म्हणून माझी धडपड सुरू झाली. सुदैवाने हा प्रश्न ग्राऊंडच्या बाजूला असलेल्या मोठाल्या झाडांनी सोडवला. माझ्या काही मित्रांसहित झाडावर बसून मी दिवसभर मॅच पाहात होतो आणि अजूनही वाटते की, पुन्हा एकदा तसेच झाडावर चढावे आणि तिथूनच मनसोक्त मॅच पहावी. मी आणि माझे मित्र मॅचचे वर्णन आमच्या बुद्धीप्रमाणे जोरजोरात हातवारे करून इतरांना ऐकवत असू, दिवसाचा खेळ झाल्यावर कोणी झेल कसा घेतला — कसा सोडला, दांडी कशी उडाली, चौकार कसा मारला याची रसभरीत चर्चा करतच आम्ही चालत चालत घरी परतत असू. ही मॅच पाहिल्यावर तिचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. विशेषत: मॅच संपल्यानंतर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी जी झिम्मड उडते, तेव्हाचे ते दृश्य काळजात भिडले. काही खेळाडू आनंदाने स्वाक्षरी देत होते, तर काही नाकारत होते. हा सर्व सोहळा पाहून मनात आले की, आपणही एक मोठे खेळाडू व्हावे. मग आपल्या भोवतीही अशीच स्वाक्षरीसाठी गर्दी होईल. बसू, तेव्हापासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरूवात झाली ! विशेष म्हणजे वर्गात गणिताच्या तासाला वहीची अनेक पाने माझ्या स्वाक्षरीने भरू लागली. जर चुकूनमागून शिक्षकांचे माझ्याकडे लक्ष गेलेच व मला प्रश्न विचारलाच तर नकळत माझ्या तोंडातून, 'हाऊज दॅट ?' असे उत्तर बाहेर पडे ! हे उद्‌गार ऐकून वर्गात एकच हशा होई आणि माझी मान लाजेने खाली होई; पण हीच लाजेने खाली घातलेली मान मी जेव्हा थोड्याच दिवसांनी आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या, तेव्हा सर्वांच्या डोळ्यातील कौतुकांचे भाव

कृ.मा.प.

गुण

पाहाण्यासाठी अभिमानाने वर झाली. माझे नाव मोठया अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि त्याच वेळी प्रथम मला क्रिकेट खेळत असल्याबद्दल धन्य — धन्य वाटले. माझ्या मनात क्रिकेटचे बीज पेरले गेले आणि उगवले ते असे.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(अ) पूना क्लबच्या ग्राऊंडवर झालेल्या मॅचमध्ये आत जाण्याचे सर्व मार्ग का बंद होते ?

(ब) मॅच बघून घरी परतत असताना लेखकाची आणि त्याच्या मित्राची कोणती चर्चा चालत असे ?

(क) कोणता सोहळा पाहून लेखकाला मोठा खेळाडू व्हावे असे वाटे ?

(ड) लेखकाची मान लाजेने खाली का जाई ?

(इ) विद्यार्थी व शिक्षकांनी लेखकाच्या पाठीवर शाबासकीची थाप केव्हा दिली ?

**प्रश्न क्र.२ खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा.** **२०**

(अ) बिनसाखरेचा चहा कडू लागतो हे पंतांच्या केव्हा लक्षात आले ?

(ब) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

(क) 'झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले' वरील ओळीतून कवी नारायण सुर्वे यांना काय सांगायचे आहे ते स्पष्ट करा.

(ड) दाजी साहेबांनी अब्दुलचा सत्कार का केला, सकारण लिहा.

(इ) पावडेकाका पर्यावरणास मारक अशी कोणती कृती करत होते ?

(फ) लेखकाला युनियन हायस्कूलमध्ये कशाप्रकारे प्रवेश मिळाला ?

**प्रश्न क्र.३ (अ) खालीलपैकी कोणत्याही दहा प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** **१०**

(अ) धडाडत्या तोफांतून काय पुढे पडत आहे ?

(ब) कथेच्या यशाचे रहस्य काय ?

(क) वनमजूर अचानक का थबकला ?

(ड) कवी कोणाला पुष्टी द्यायला सांगतात.

(इ) झाडांच्या जीवनांचे एकसंथ गाणे कोठे दडले आहे ?

(फ) लेखकाचे वडील कुठल्या खात्यामध्ये नोकरी करत ?

(ग) निरंजनाच्या काय ध्यानी आले ?

(ह) कवी उत्क्रांतीचा ललकार कोठे घुमवायला सांगतात ?

(य) लेखक विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून कोणत्या ठिकाणी गेले होते ?

(र) पंतांनी कोणती भीष्मप्रतिज्ञा केली ?

(ल) अब्दुलने मफलर कानाला घट्ट का लपेटून घेतला ?

(व) लेखकाचा व लहान मुलांचा कौतुकाचा कार्यक्रम कोणता होता ?

(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा. — गुण ५

(१) वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी।
नामा म्हणे मेघा जैसा। विनवितो चातक जैसा।

(२) दुनियेचा विचार हरघडी केला; असा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो.

(३) तुझी विजयाची दौड
डोळे भरूनी पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी.

**प्रश्न क्र.४ खालीलपैकी कोणत्याही दहा रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** १०

(अ) मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून ................ मित्राकडे ठेवले.

(ब) कुटुंबाचा मात्र माझ्या ................ बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता.

(क) ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून मी बार्कमध्ये ................ म्हणून जॉईन झालो.

(ड) ................ त्या गोलाकार कमानीकडे अब्दुलचे लक्ष गेले.

(इ) आपल्या जीवनशैलीतून उमटणाऱ्या आपल्या ................ प्रिन्टस् रेखाटतं.

(फ) मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण ................ या जगात मान नाही.

(ग) साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार वि.स.खांडेकर यांच्या ................ या कादंबरीला मिळाला.

(ह) लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात धोकादायक ................ !

(य) एखादी जादू व्हावी त्याप्रमाणे झाडाझुडपांना ................ फुटते.

(र) ................ होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत.

(ल) शेकडो माणसांचा जीव वाचवलास आणि ................ खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झालास.

**प्रश्न क्र.५ (अ) खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** १०

(१) सावध करणे (२) तत्पर असणे
(३) घाम गाळणे (४) धाबे दणाणणे
(५) प्रसंगावधान राखणे (६) काळजात धस्स होणे

**(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचे अर्थ लिहा.** ५

(१) आरसा (२) उत्सव (३) परिश्रम
(४) काठ (५) कार्य (६) पक्षी

गुण

प्रश्न क्र.६ **(अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा.** ५

(१) बाबा, पाच — सहा दिवसांपूर्वी मी तुम्हांला दोन ........... दिल्या.

(२) आचाऱ्याने मिठाईत ........... न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती.

(३) ........... मेघरहित निळ्या नितळाईने नटले होते.

(४) स्वच्छतेची भोवती असलेली ........... त्यामुळे त्रासली होती.

(५) मला नाल्यातील ओलसर चिखलात ........... मोठ्या आकाराची अनेक पावलं उमटलेली दिसली.

(६) कॅक्टस हे ........... खंडातले झाड आहे.

**(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा.** ५

(१) तिच्या डोळ्यांतला क्रोध त्याच्या परिचयाचा होता.

(२) काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे.

(३) शिक्षणाबद्दल एक आंतिरिक ओढ वाटू लागली.

(४) वाचनीय आणि प्रेक्षणीय व्हावं अशी त्याची अपेक्षा असते.

(५) वाघाच्या लहान पिल्लांना इतर भक्षकापासून खूपच धोका असतो.

(६) वाळवंटाचे ओसाड, भकास जीवन पुन्हा सुरू होते.

**(क) पुढीलपैकी कोणत्याही पाच नामांची वचने बदला.** ५

(१) दिशा (२) गाय

(३) सून (४) वही

(५) वात (६) देव

**(ड) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांपासून नामे बनवा.** ५

(१) प्रासंगिक (२) सांस्कृतिक

(३) भावनिक (४) मासिक

(५) आर्थिक (६) सैद्धांतिक

**(इ) पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांच्या संधी सोडवा.** ५

(१) कविच्छा (२) सूर्यास्त

(३) गणाधीश (४) देवालय

(५) विद्याभ्यास (६) मिष्टान्न

गुण

**(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही पाच वाक्ये पुन्हा लिहा.** **५**

(१) मी आहारशास्त्रावरच्या पूस्तकात डोके घालु लागलो.
(वाक्य शुद्ध करून लिहा.)

(२) अब्दुल एकेकीच्या हातात बांगड्या भरू लागला.
(अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.)

(३) मामी मी एक ॲप तयार केलं आहे.
(वाक्याचा प्रकार ओळखा.)

(४) त्याने मला डाएटचा सल्ला दिला.
(कर्त्याचे लिंग बदला.)

(५) रेखा मावशींनी दोन झाडं लावली.
(अधोरेखित नामांचे वचन बदलून वाक्ये लिहा.)

(६) पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा.
(वाक्यातील अलंकार ओळखा.)

-*-*-*-*-*-*-*-

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद**

दिनांक : २० जानेवारी, २०१९

(**वेळ** : दुपारी २.१५ ते सायंकाळी ४.४५)

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना** :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

**प्रश्न क्र.१ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा. २०**

(अ) आपत्ती व्यवस्थापन: एक आव्हान

(ब) शिक्षणातील इंटरनेटचे महत्त्व, गरज व फायदे

**प्रश्न क्र.२ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा. २०**

(अ) लैंगिक शिक्षण असावे का ?

(ब) आर्थिक निकषावर आधारित आरक्षण असावे का ?

**प्रश्न क्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा. ३०**

(अ) एखादा कर्मचारी वारंवार रजेवर राहतो यास्तव त्याला कारणे दाखवा नोटीस बनवण्यासाठी टिप्पणी व पत्राचे प्रारूप तयार करा.

(ब) ज्येष्ठता सूची दुरूस्त करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यास विनंतीपत्र लिहा.

(क) अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत विनंतीपत्र लिहा.

(ड) कमी पाऊस पडल्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करण्याबाबत सूचना देणारे परिपत्रक तयार करा.

**प्रश्न क्र.४ खालीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दप्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या. ५**

(अ) Advocate General
(ब) Warrant Officer
(क) Joint Registrar
(ड) Embankment Inspector
(इ) Lunatic Attendant
(फ) Tradesman

कृ.मा.प.

गुण

प्रश्न क्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १०

(अ) The House or each House of Lagislature of a state shall have a separate secretarial staff.

(ब) A money Bill shall not be introduced in a legislative Council.

(क) The term of office of elected members of the board and its office bearers shall be five years from the date of election and the term of office bearers shall be conterminous with the term of the board.

(ड) A person who holds office as a member of a public service commission shall, on the expiration of his term of office, be ineligible for re-appointment to that office.

(इ) The chairman of the Union Public Service Commission shall be ineligible for further employment either under the Government of India or under the Government of a state.

(फ) There shall be a special officer for linguistic minorities to be appointed by the president .

प्रश्न क्र.६ खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. १५

The President may by order appoint a Commission consisting of such persons as he thinks fit to investigate the conditions of socially and educationally backward classes within the territory of India the difficulties under which they labour and to make recommendations as to the steps that should be taken by the Union or any State to remove such difficulties and to improve their condition and as to the grants that should be made for the purpose by the Union or any state and the conditions subject to which such grants should be made, and the order appointing such Commission shall define the procedure to be followed by the Commission. A Commission so appointed shall investigate the matters referred to them and present to the President a report setting out the facts as found by them and making such recommendations as they think proper.

*-*-*-*-*-*-*-*-*